PDF Compressor Free Version

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** रामनगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0648 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**20/06/2024 01:01

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 19/06/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/06/2024
**Time From (वेळेपासून):** 10:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/06/2024 **Time (वेळ):** 00:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/06/2024 01:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** रोमा ईलेक्ट्रीकल समोर ,सेलीब्रेशन हॉटेल जवळ, रामनगर चौक चंद्रपुर ,चंद्रपुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

PDF Compressor Free Version

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** किशोर रामराव वडस्कर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा वेळाबाई ता वणी,जि यवतमाळ ,वणी,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा वेळाबाई ता वणी,जि यवतमाळ ,वणी,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9209523968

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अशोक बाबुरावजी बगुलकर | | | 1. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, व रुग्नालय चंद्रपुर ,रामनगर, चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | दीपक केशवराव सज्जनवार | | | 1. शासकीय महाविद्यालय व, रुग्नालय चंद्रपुर ,रामनगर,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ध्वनी उपकरणे | 32 GB क्षमता असलेले दोन मेमोरी कार्ड Sandiskकम्पनीचे | 0.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रु दराचे 20 नोटा | 10,000.00 |
| 3 | इतर | घरगुती वस्तु | निळ्या व हीरव्या रंगाचा चेक्स असलेला शर्ट | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद
दिनांक:- 19/06/2024
ठिकाण:- चंद्रपूर

मी किशोर रामराव वडस्कर, वय 38 वर्ष, व्यवसाय- वाहन चालक, राज्य परिवहन महामंडळ, आगार चंद्रपुर, रा. वेळाबाई, ता. वणी. जि. यवतमाळ आज दि. 19/06/2023 रोजी सकाळी 10/00 वा. मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथे प्रत्यक्ष हजर येवून श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपुर यांचे समक्ष दोन लोकसेवकाविरूद्ध लाच मागणी संबंधाने खालीलप्रमाणे तक्रार दिली.

'' सविनय विनंती याप्रमाणे आहे की, मी वरील नमुद पत्त्यावर आपले परिवारासह राहत असुन महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ येथे डिसेंबर 2014 मध्ये वाहन चालक या पदावर मुंबई येथील उरण आगार येथे रूजु झालो. एप्रिल 2019 मध्ये माझी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, आगार चंद्रपूर येथे विनंती बदली झाल्याने मी एप्रिल 2019 पासुन चंद्रपूर येथे कार्यरत आहे. मे 2022 मध्ये बंगाली कॅम्प चंद्रपूर येथे माझा मोटार सायकलने अपघात झाल्याने माझ्या उजव्या पायाला जबर मार लागला. त्यामुळे माझे उजव्या पायावर जिल्हा सामान्य रूग्णालय, चंद्रपूर येथे ऑपरेशन करून पायात रॉड टाकण्यात आला. त्यामुळे मी आठ ते नऊ महीने वैद्यकीय रजेवर होतो. त्यानंतर माहे जानेवारी 2023 मध्ये चंद्रपूर आगार येथे कर्तव्यावर रूजु झालो. कर्तव्यावर असतांना माहे नोव्हेंबर/2023 मध्ये माझे ऑपरेशन झालेल्या पायात सुज आल्याने मी उपचाराकरीता खाजगी दवाखाना मध्ये गेलो असता डॉ. आंबटकर व सालफडे या दोन्ही डॉक्टरांनी मला पायात टाकलेल्या रॉडचा स्क्रु तुटल्यामुळे इन्फेक्शन झाले असुन लवकरात लवकर ऑपरेशन करण्याबाबत सांगीतले. त्यामुळे मी नोव्हेंबर 2023 मध्ये वैद्यकीय उपचाराकरीता श्री. रामटेके साहेब डेपो मॅनेजर यांचे कडुन रीतसर रजा घेतली व नागपूर येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान (एम्स) येथे माझा वैद्यकीय उपचार केला. उपचार झाल्या नंतर मला एम्स हॉस्पीटल येथील डॉक्टरांनी तीन महीने आराम करण्यास सांगीतले. मार्च 2024 मध्ये मी परत चेकअप करीता नागपूर येथील एम्स हॉस्पीटल येथे गेलो असता तेथील डॉक्टरांनी मला ड्युटीवर हजर होवू शकता परंतु जड वाहने चालवू नका असे सांगितले. त्यामुळे मी चंद्रपूर आगार येथे कर्तव्यावर हजर होणेकरीता गेलो असता मला चंद्रपूर आगाराचे व्यवस्थापक श्री. रामटेके साहेब यांनी वैद्यकीय अधिकारी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र घेवून येण्यास सांगितले. त्यामुळे मी जिल्हा सामान्य रूग्णालय चंद्रपूर येथील वैद्यकीय अधिकारी यांचेकडून वैद्यकीय प्रमाणपत्र घेवून आगार व्यवस्थापक यांना दिले. परंतु सदर वैद्यकीय प्रमाणपत्रावर ''फिट फोर लाईट डयुटी एक्सेप्ट ड्रायव्हींग'' असा शेरा नमुद असल्याने आगार व्यवस्थापक हे मला लाईट ड्युटी देवू शकत नसल्याचे सांगुन माझे कागदपत्र पुढील आदेशाकरीता मा. विभागीय वाहतुक अधिकारी, राज्य परिवहन विभाग, चंद्रपूर यांचेकडे पाठविण्यात आले. त्यामुळे मी विभागीय वाहतुक अधिकारी कार्यालयातील विभाग नियंत्रक कार्यालय चंद्रपूर येथे जावून तेथील सुतवणे मॅडम यांना भेटलो असता त्यांनी मला वाहन चालक पदा व्यतिरिक्त ईतर दुस-या पदाकरीता रूजु करून घेण्याकरीता वैद्यकीय मंडळाकडून तपासनी

PDF Compressor Free Version

करण्याकरीता सांगितले. त्यानुसार विभाग नियंत्रक कार्यालयाकडून दि. 01/04/2024 रोजी मा. अध्यक्ष, वैद्यकीय
मंडळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, चंद्रपूर यांना पत्र देण्यात आले. त्यावरून माझी माहे एप्रिल
महिण्यात वैद्यकीय मंडळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, चंद्रपूर यांचेकडे वैद्यकीय तपासणी करण्यात
आली व तसा अहवाल विभाग नियंत्रक, राज्य परिवहन चंद्रपूर यांचेकडे पाठविण्यात आला. परंतु सदर अहवालामध्ये
मी चालक पदाची कामगीरी करण्याकरीता पात्र आहे किव्हा नाही या बाबत सुस्पष्ट नमुद करण्यात आले नसल्याने
वैद्यकीय अहवाल देवुन सहकार्य करण्याबाबत कार्यालयीन पत्रांन्वये दि. 15/05/2024 रोजी वैद्यकीय मंडळ
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, चंद्रपुर यांना कळविण्यात आले. परंतु वैद्यकीय मंडळाकडुन कोणताही
अहवाल प्राप्त न झाल्याने मी स्वत: दि. 15/05/2024 रोजी चे कार्यालयीन पत्राची प्रत घेवुन शासकीय वैद्यकीय
महावीद्यालय व रूग्णालय, चंद्रपुर येथे दि. 05/06/2024 रोजी जावुन तेथील बगुलकर बाबु यांना भेटलो असता
आमचे कार्यालयातुन पाठविण्यात आलेले पत्र त्यांना प्राप्त झाले नाही असे त्यांनी सांगितले म्हणुन मी माझेजवळ
असलेली कार्यालयीन पत्राची प्रत तेथील आवक जावक विभागात बगुलकर बाबु यांचे सांगण्यावरून दिली. तेव्हा
बगुलकर बाबु यांनी मला दि. 10/06/2024 रोजी सोमवारला येण्यास सांगीतले. सोमवार ला त्यांना भेटण्यास
गेलो असता त्यांनी मला माझे काम होणे बाकी असल्याचे सांगितले व त्यांचे कार्यालयात हजर असलेल्या एका
इसमाकडे बोट करून त्या बाबुला भेटण्यास सांगितले व येण्यापुर्वी त्यांचे मोबाईलवर फोन करून विचारणा करून
दोन दिवसानंतर येण्यास सांगीतले. त्यामुळे मी बगुलकर यांचे सांगण्यावरून तेथील बाबु ज्यांचे मला नाव माहित
नाही त्यांचे जवळ जावून त्यांचेकडून त्यांचा मो.क्र. 9503131925 घेतला व बोर्ड बाबु या नावाने मोबाईलमध्ये
सेव्ह केला. मी दोन दिवसानंतर बुधवारला सकाळी 09:30 वा. चे सुमारास मो.क्र. 9503131925 वर माझे
मोबाईल वरून फोन करून बोर्ड बाबु यांचेशी बोलनी केली असता त्यांनी मला माझे रंगीत पासपोर्ट फोटो सोबत
घेवुन येण्यास सांगीतले. त्यामुळे मी माझे कागदपत्र व फोटोसह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, चंद्रपुर
येथे गेलो व बोर्ड बाबु यांचेकडे दिले. त्यानंतर मी परत दि. 14/06/2024 ला बगुलकर बाबु यांना भेटलो असता
त्यांनी मला 'तुला लगेच वैद्यकीय मंडळाचे वैद्यकीय अहवाल पाहीजे असल्यास मला 10,000/- रू द्यावे लागतील.
जर तु 10,000 रूपये दिले नाही तर तुझे काम होणार नाही' असे म्हणाले त्यावर मी त्यांना 'साहेब माझे नुकतेच
ऑपरेशन झाले असुन मी वैद्यकीय रजेवर असल्याने मला वेतनही भेटत नाही. त्यामुळे माझे काम लवकर करून द्या'
अशी विनंती केली असता त्यांनी मला तुला पैसे द्यावेच लागेल असे म्हणाले व येण्यापुर्वी माझ्या कर्मचा-याशी फोनवर
बोलुन घेण्यास सांगितले. त्यामुळे मी त्यांना नाईलाजास्तव होकार देवुन तेथुन निघुन आलो. माझे काम न झाल्याने
मी काल दि. 18/06/2024 रोजी सायंकाळी 05/30 वा दरम्यान मो.क्र. 9503131925 वर माझे मोबाईल
वरून फोन करून बोर्ड बाबु यांचेशी बोलनी केली असता त्यांनी मला बगुलकर बाबु यांनी तुम्हाला 10,000/- रूपये
घेवुन येण्यास सांगीतले आहे. त्यानंतर लगेच मी बगुलकर बाबु यांचे मोबाईल क्र. 8149773850 यावर फोन
करून माझे कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी सुध्दा मला 10,000/- रूपये देण्यास सांगुन जर मी त्यांना
पैसे दिले नाही तर माझे काम लवकर होणार नाही असे सांगीतले. मला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय,
चंद्रपुर येथील वैद्यकीय मंडळातील बगुलकर बाबु व बोर्ड बाबु यांना माझे वैद्यकीय अहवाल देण्याचे कामाकरीता
10,000/- रू. लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने बगुलकर बाबु व बोर्ड बाबु या दोघांविरूध्द कार्यवाही होणे
बाबत आज रोजी लाचलुचपत प्रतीबंधक विभाग, चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन लेखी तक्रार देत आहो. बगुलकर बाबु
व बोर्ड बाबु या दोघांनी मला मागणी केलेली व त्यांना देण्याकरीता माझे वैयक्तीक बचती मधील जमा असलेले
10,000/- रू. यावेळी लाचरक्कम म्हणुन वापरण्याकरीता देत आहे. माझा बगुलकर बाबु व बोर्ड बाबु या दोघांशी
कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नसुन त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही. तरी माझे तक्रारीवरून मला
वैद्यकीय मंडळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, चंद्रपुर येथुन मला नोकरीवर रूजु होणेकरीता
आवश्यक असलेला वैद्यकीय अहवाल देण्याचे कामाकरीता 10,000/- रू. लाचेची मागणी करणा-या बगुलकर बाबु
व बोर्ड बाबु या दोघांविरुध्द कायदेशीर कार्यवाही होणेस विंनती आहे.'' याप्रकारची लेखी तक्रार दिली होती.
यानंतर भोसले मॅडम यांनी सकाळी 11/00 वा. दरम्यान त्यांचे कार्यालयात हजर असलेले रोशन चांदेकर यांना
बोलावुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे नावे पत्र देवून दोन पंच आणणेकरीता रवाना
केले. त्यांनतर अदांजे 11/40 वा. दरम्याण रोशन चांदेकर दोन पंचासह कार्यालयात परत आले. त्या पंचाना भोसले
मॅडम यांनी त्यांची नावे विचारून माझी त्यांचेशी व ऑफीसच्या स्टाफशी ओळख करुन दिली. त्यांनतर भोसले मॅडम
यांनी दोन्ही पंचांना मी दिलेल्या तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास
दिला. त्यानंतर मी सही करून दिलेल्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी व भोसले मॅडम यांनी स्वाक्षरी केली.
त्यानंतर भोसले मॅडम यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे
काम करतो याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर भोसले मॅडम यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी

PDF Compressor Free Version

करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर भोसले मॅडम यांनी मी जमा केलेली सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी रक्कम रू. 10,000/- (रू. 500/- दराच्या 20 चलनी नोटा) घेतल्या आणि सदर नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. सदर नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म समजावले व लाचेच्या रकमेस अँथ्रॅसिन पावडर लावून प्रात्यक्षिक करुन दाखविले व सदर नोटा एका लिफाफ्यात टाकुन सदर लिफाफा भोसले मॅडम यांनी स्वत:चे ताब्यात ठेवला. (याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा क्र. 1 श्रीमती भोसले मॅडम यांनी तयार केला.)
त्यानंतर पंचासमक्ष श्री. बगुलकर व बोर्ड बाबु असे दोघांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगुन भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.
त्यानंतर दुपारी 01/45 वा. भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझ्या छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून माझे दुचाकी वाहन क्र. एम.एच.29-ए.सी. 4489 नी पंच क्र. 01 यांचेसह ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथून शासकीय वैद्यकीय महाविद्यायल व रूग्णालय, चंद्रपूर येथे पडताळणी करीता पाठविले. मी व पंच क्र. 1 सोबत ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथून शासकीय वैद्यकीय महाविद्यायल व रूग्णालय, चंद्रपूर येथे गेलो. तेथे जावून मी माझा फोन बघीतला असता माझे मोबाईलवर बगुलकर यांचा मिस कॉल आला असल्याचे दिसल्याने मि त्यांना पंच क्र. 1 समक्ष फोन करुन फोन स्पिकरवर केला असता श्री. बगुलकर बाबु यांनी मला ''रामनगरच्या ऑफिसमध्ये जा वर, कॅश देवून दे, त्याला रिसिव्ह देवून दे आणि त्याच्याकडे जमा करुन दे'' असे सांगितले. त्यानंतर मी पंच क्र. 1 सह शासकीय वैद्यकीय महाविद्यायल व रूग्णालय, चंद्रपूर येथील बोर्ड बाबु जेथे असतात त्यांचे रूममध्ये गेलो असता त्यांनी मला माझे सोबत असलेल्या पंचाबाबत विचारणा करुन पंचास बाहेर थांबण्यास सांगितले. त्यामुळे पंच हे त्यांचे रूमच्या बाहेर जावून दाराजवळ थांबून उभे राहीले. त्यांनतर पडताळणी दरम्यान बोर्ड बाबु यांनी मला 'तुम्हाला पाहिजे तसा शेरा टाकला आहे. 5-6 दिवस लागतील पोस्टाले. उद्या टाकतो मी पोस्टात. गव्हर्मेंट लेटर आणि ओसी घ्या. ओसीवर अनफिट फॉर ड्रायव्हर ड्युटी लिहीलं आहे' असे म्हणाले (उर्वरीत फीर्याद मुळ फीर्यादीप्रमाणे)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SUNIL VITTHALRAV GADE(I (Inspector)) / pcmh94158 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

PDF Compressor Free Version

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SUNIL VITTHALRAV (
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pcmh94158

PDF Compressor Free Version

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

PDF Compressor Free Version

## General Diary Details
## ठाणे दैनंदिनी तपशील

**State** (राज्य): महाराष्ट्र **District** (जिल्हा): चंद्रपुर
**P.S.** (पोलीस ठाणे): रामनगर

1. **G.D. No.** (ठाणे दैनंदिनी क्र.): 006
2. **G.D. Date & Time** (ठा. दै. दिनांक आणि वेळ): 20/06/2024 01:24 वाजता
3. **G.D. Type** (ठाणे दैनंदिनी प्रकार): इतर
4. **Entry for (officer)** (करिता नोंद(अधिकारी )): MAHADEOPATRUJIKHOBRAGADE /पोलीस शिपाई
5. **Case Type** (प्रकरणाचा प्रकार) :
6. **G.D. Brief** (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):
यावेळी नोंद आहे की पो स्टे रामनगर अप क्र 648/024 कलम 7,12 भ्रष्टाचार प्रतीबंध अधिनीयम 1988 (सुधारीत2018) गुन्ह्यामधील फीर्यादि मध्ये दिनांक 19/06/2024 ऐवजी नजरचुकीने दिनांक 19/06/2023 असे झाले करीता स्टेशन डायरी नोंद घेण्यात आली.
7. **G.D. Subject** (ठा. दै. चा विषय):
घेणे नोंद
8. **Acts & Sections** (अधिनियम आणि कलम):

| Sr.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

**Report Printed on**
(अहवाल मुद्रित केलेला दिनांक): 20/06/2024

**Report Printed by** (द्वारे अहवाल मुद्रित केला):
**Name** (नाव): SUNIL VITTHALRAV GADE
**Rank** (पद): I (Inspector)

**Signature of G.D. Entry By** (ठा. दै. नोंद करणाऱ्याची सही):
**Name** (नाव): SUNIL VITTHALRAV GADE
**Rank** (पद): I (Inspector)
**No.**(क्र.): pcmh94158